**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहेत:-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०२/ २००९/ सोलापूर | श्री. नितीन शहाजी कदम मु. पो. वेळापूर (शेरी नं.२) ता माळशिरस, जि. सोलापूर | वसंतराव पवार विधी महाविद्याय बारामती, ता.बारामती, जि. पुणे | वसंतराव पवार विधी महाविद्याय बारामती, ता.बारामती जि. पुणे | शैक्षणिक वर्ष २००८- २००९ या कालाव -धीतील एल. एल. बी. दुस-या व तिस-या वर्षातील ई. बी. सी सवलतीच्या अनुषंगाने माहिती. | फार्म भरलेल्या सर्व तसेच सदर दोन वर्गातील इ. बी. सी. फॉर्म भरलेल्या कोणाचीही फी नामंजूर झाली नाही, हे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. |
| २ | ६५/ २००९/ सोलापूर | श्री.सोपान नारायण बाबर मु. पो. चोपडी, ता.सांगोला, जि. सोलापूर | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शाखा ता.सांगोला, जि. सोलापूर | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, संवंसू विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर | मौजे चोपडी ग्रामपंचायत हद्दीतील गट नं ३८५ च्या विद्युत कनेक्शनबाबत माहिती. | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ३ | ७१/ २००९/ सोलापूर | श्री. हनुमंत वासुदेव खरात चव्हाण प्लॉट, उपळाई रोड, बार्शी, जि. सोलापूर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, सोलापूर | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद, सोलापूर | श्री. एस. व्ही. धोत्रे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांनी ग्रामसेवक व ग्राम -विकास अधिकारी यांचेकडून पैसे घेतलेल्या तक्रारीची प्रत व चौकशी अहवालाच्या प्रती. | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | ११०/ २००९/ सोलापूर | श्री. श्रीनिवास मनोहर बडवे रा. २९४३, भाजी मार्केट जवळ, पंढरपूर जि. सोलापूर | प्रशासन अधिकारी (सॉ सेंटर विभाग), पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर | मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर | श्री. राजाराम मस्के यांच्या गाळयासबंधित कार्यवाहीबाबतची माहिती. | जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सदर आदेश प्राप्त झाल्या पासून आठ दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर करावा.त्याची प्रत अपिलकर्त्यास पाठवावी. |
| ५ | ११२/ २००९/ सोलापूर | श्रीमती. अख्तरबी मुसामियाँ बरोटे व इतर २ घर नं १४४, सहकारनगर, होडगी रोड, सोलापूर | तहसील कार्यालय, परांडा, जि. उस्मानाबाद | उपविभागीय अधिकारी भूम, परांडा, ता. भूम, जिल्हा उस्मानाबाद | मौजे खारापुरी, तालुका परांडा येथील गट नं ८६ अ आणि ७ पैकी हे ३.७७ आर यावर वारसाची नांवे नोंद करून त्याप्रमाणे फेरफार मिळणेबाबत | अपीलकर्त्याची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसांत आयोगाला सादर करावा.त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी. |
| ६ | ११३/ २००९/ सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी श्री. दत्त रोड, मु. कुर्डुवाडी, ता.माढा, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय माढा, ता. माढा, जि. सोलापूर | तहसीलदार, तहसील कार्यालय, माढा, ता. माढा, जि. सोलापूर | तहसील कार्यालय, माढा (पुरवठा विभाग) यांच्यामार्फत कुर्डुवाडी शहरातील स्वस्त धान्य दुकान व रॉकेल परवाना धारकांबाबत माहिती. | अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही ढोबळ व विस्तृत स्वरूपाची आहे. अपीलकर्त्याने नेमकी माहिती मागावी व जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावेत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ११४/ २००९/ सोलापूर | श्री. रामगोंडा चनबसप्पा बिराजदार मु. पो. औराद, ता.द.सोलापूर, जि. सोलापूर | विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, औराद, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर | सहायक निबंधक सहकारी संस्था, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर | अपीलकर्त्याने दि. २/७/२००८ रोजीच्या अर्जासबंधात माहे ऑगस्ट, २००८ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी सोलापूर या बँक इन्स्पेक्टर यांच्या उपस्थित पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पारित केलेल्या ठरावाची खरी नक्कल. | अपीलकर्ते यांनी मागणी केलेली माहिती ही संस्थेच्या दफ्तरी नसल्याने देण्यात आली नाही, ही बाब जन माहिती अधिकारी यांनी निदर्शनास आणल्यामुळे अपील फेटळण्यात येत आहे, हा अपिलीय प्राधिकारी यांचा दि १६/२/२००९ रोजीचा निर्णय कायम ठेवण्यात येत आहे. |
| ८ | १७१/ २००९/ सोलापूर | श्री. विश्वास मनोहर ठिगळे नवी पेठ, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर | प्रशासन अधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर | मुख्याधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर | सन १९९५ पर्यंत या नगरपालिके मधील नोकरभरती, स्वत:ची नियुक्ती कशाच्या आधारे केली त्या पत्राची प्रत, सन १९८५ ते १९९५ या कालाव - धीतील नोकरी भरतीबाबत माहिती, सर्वसाधारण ठराव क्र. ५७१ दि. ३०/०४/०१ च्या बाबत माहिती अशा प्रकारे एकूण ०८ मुद्दयांची माहिती. | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १७२/ २००९/ सोलापूर | श्री. दत्तु सोपान थिटे मु. पिरटाकळी, पो. तिन्हे, ता. मोहोळ. जि. सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | अर्जदाराने माहितीची मागणी तपशील अर्जात नमूद केलेला नाही, | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

आदेश

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ९ (०२/२००९/सोलापूर, ६५/२००९/सोलापूर, ७१/२००९/सोलापूर, ११०/२००९/सोलापूर,११२/२००९/सोलापूर,११३/२००९/सोलापूर,११४/२००९/सोलापूर,१७१/२००९/सोलापूर, १७२/२००९/सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र ११०/२००९/सोलापूर व ११२/२००९/सोलापूर, मधील अपिलांमध्ये आवश्यक ती कार्यवाही करून अनुपालन अहवाल मुदतपुर्तीनंतर आठ दिवसात आयोगास सादर करावा, अन्यथा सबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तद्नुषंगिक कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि.३०.६.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहेत:-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०२/ २००९/ सोलापूर | श्री. नितीन शहाजी कदम मु. पो. वेळापूर (शेरी नं.२) ता माळशिरस, जि. सोलापूर | वसंतराव पवार विधी महाविद्याय बारामती, ता.बारामती, जि. पुणे | वसंतराव पवार विधी महाविद्याय बारामती, ता.बारामती जि. पुणे | शैक्षणिक वर्ष २००८- २००९ या कालाव -धीतील एल. एल. बी. दुस-या व तिस-या वर्षातील ई. बी. सी सवलतीच्या अनुषंगाने माहिती. | फार्म भरलेल्या सर्व तसेच सदर दोन वर्गातील इ. बी. सी. फॉर्म भरलेल्या कोणाचीही फी नामंजूर झाली नाही, हे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. |
| २ | ६५/ २००९/ सोलापूर | श्री.सोपान नारायण बाबर मु. पो. चोपडी, ता.सांगोला, जि. सोलापूर | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शाखा ता.सांगोला, जि. सोलापूर | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, संवंसू विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर | मौजे चोपडी ग्रामपंचायत हद्दीतील गट नं ३८५ च्या विद्युत कनेक्शनबाबत माहिती. | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ३ | ७१/ २००९/ सोलापूर | श्री. हनुमंत वासुदेव खरात चव्हाण प्लॉट, उपळाई रोड, बार्शी, जि. सोलापूर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, सोलापूर | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद, सोलापूर | श्री. एस. व्ही. धोत्रे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांनी ग्रामसेवक व ग्राम -विकास अधिकारी यांचेकडून पैसे घेतलेल्या तक्रारीची प्रत व चौकशी अहवालाच्या प्रती. | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ११०/ २००९/ सोलापूर | श्री .श्रीनिवास मनोहर बडवे रा. २९४३, भाजी मार्केट जवळ, पंढरपूर जि. सोलापूर | प्रशासन अधिकारी (सॉ सेंटर विभाग), पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर | मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर | श्री. राजाराम मस्के यांच्या गाळयासबंधित कार्यवाहीबाबतची माहिती. | जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सदर आदेश प्राप्त झाल्या पासून आठ दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर करावा.त्याची प्रत अपिलकर्त्यास पाठवावा. |
| ५ | ११२/ २००९/ सोलापूर | श्रीमती. अख्तरबी मुसामियाँ बरोटे व इतर २ घर नं १४४, सहकारनगर, होडगी रोड, सोलापूर | तहसील कार्यालय, परांडा, जि. उस्मानाबाद | उपविभागीय अधिकारी भूम, परांडा, ता. भूम, जिल्हा उस्मानाबाद | मौजे खारापुरी, तालुका परांडा येथील गट नं ८६ अ आणि ७ पैकी हे ३.७७ आर यावर वारसाची नांवे नोंद करून त्याप्रमाणे फेरफार मिळणेबाबत | अपीलकर्त्याची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसांत आयोगाला सादर करावा.त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी. |
| ६ | ११३/ २००९/ सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी श्री. दत्त रोड, मु..कुर्डुवाडी, ता.माढा, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय माढा, ता. माढा, जि. सोलापूर | तहसीलदार, तहसील कार्यालय, माढा, ता. माढा, जि. सोलापूर | तहसील कार्यालय, माढा (पुरवठा विभाग) यांच्यामार्फत कुर्डुवाडी शहरातील स्वस्त धान्य दुकान व रॉकेल परवाना धारकांबाबत माहिती. | अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही ढोबळ व विस्तृत स्वरूपाची आहे. अपीलकर्त्याने नेमकी माहिती मागावी व जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावेत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ११४/ २००९/ सोलापूर | श्री. रामगोंडा चनबसप्पा बिराजदार मु. पो. औराद, ता.द.सोलापूर, जि. सोलापूर | विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, औराद, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर | सहायक निबंधक सहकारी संस्था, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर | अपीलकर्त्याने दि. २/७/२००८ रोजीच्या अर्जासबंधात माहे ऑगस्ट, २००८ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी सोलापूर या बँक इन्स्पेक्टर यांच्या उपस्थित पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पारित केलेल्या ठरावाची खरी नक्कल. | अपीलकर्ते यांनी मागणी केलेली माहिती ही संस्थेच्या दप्तरी नसल्याने देण्यात आली नाही, ही बाब जन माहिती अधिकारी यांनी निदर्शनास आणल्यामुळे अपील फेटळण्यात येत आहे, हा अपिलीय प्राधिकारी यांचा दि १६/२/२००९ रोजीचा निर्णय कायम ठेवण्यात येत आहे. |
| ८ | १७१/ २००९/ सोलापूर | श्री. विश्वास मनोहर ठिगळे नवी पेठ, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर | प्रशासन अधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर | मुख्याधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर | सन १९९५ पर्यंत या नगरपालिके मधील नोकरभरती, स्वत:ची नियुक्ती कशाच्या आधारे केली त्या पत्राची प्रत, सन १९८५ ते १९९५ या कालाव - धीतील नोकरी भरतीबाबत माहिती, सर्वसाधारण ठराव क्र. ५७१ दि. ३०/०४/०१ च्या बाबत माहिती अशा प्रकारे एकूण ०८ मुद्दयांची माहिती. | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १७२/ २००९/ सोलापूर | श्री. दत्तू सोपान थिटे मु. पिरटाकळी, पो. तिन्हे, ता. मोहोळ. जि. सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | अर्जदाराने माहितीची मागणी तपशील अर्जात नमूद केलेला नाही, | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ९ (०२/२००९/सोलापूर, ६५/२००९/सोलापूर, ७१/२००९/सोलापूर, ११०/२००९/सोलापूर,११२/२००९/सोलापूर,११३/२००९/सोलापूर,११४/२००९/सोलापूर,१७१/२००९/सोलापूर, १७२/२००९/सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र ११०/२००९/सोलापूर व ११२/२००९/सोलापूर, मधील अपिलांमध्ये आवश्यक ती कार्यवाही करून अनुपालन अहवाल मुदतपुर्तीनंतर आठ दिवसात आयोगास सादर करावा, अन्यथा सबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तद्नुषंगिक कारवाईस पात्र राहतील.

**पुणे**
**दि. ३०/६/२००९**

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १/पुणे | श्री. हमीद माणिक शेख रा. स.नं. ३०/७/२, घ.नं.२८०, कृष्णा पणन सोसायटी समोर, आंबेगाव बु. ता.हवेली, जि.पुणे | प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | निवासी उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | स्वेच्छानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन संबंधित काम किती दिवसात पूर्ण करावयाचे आहे. कार्यालय प्रमुखाने मुदतीत काम पूर्ण केले नसेल तर त्यांच्यावर कोणती कारवाई करता येते ? | अपीलकर्त्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार योग्य अधिकाऱ्याकडे अर्ज केला नाही. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक यांनी दि.१.४.२००९ रोजी दिलेले उत्तर योग्य आहे. |
| २ | १४/ पुणे | श्री. हमीद माणिक शेख | प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | निवासी उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छानिवृत्ती घेताना सिव्हिल सर्जनच्या दाखल्याची गरज आहे का ? अशा रीतीने स्वेच्छा - निवृत्ती मंजूर केल्यावर विशेष वैद्यकीय रजा किती महिने मिळते. या रजेच्या कालावधीत संपूर्ण वेतन मिळते | अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार योग्य अधिकाऱ्यांकडे अर्ज केला नाही. प्रस्तुत अपिलात जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसांत अपीलकर्त्यास माहिती द्यावी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | का.तसेच वारसांना शासकीय नोकरी मिळते का याबाबत माहिती | |
| ३ | १५१७/ पुणे | श्री. गंगाधर अनंथा जैद रा.गुरुकृपा कॉम्प्लेक्स, वाडा रोड, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे | तहसीलदार सी.एफ.सी. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | उप विभागीय अधिकारी, पुणे शहर, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | जातीचा दाखला मिळण्या संदर्भात एकूण सहा मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याने विहित शुल्क भरलेले नाही. ते भरल्यानंतर माहिती उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी , अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | १९९७/ पुणे | श्री. लक्ष्मण प्रल्हाद गोसावी मु.पो.सोनगांव, ता.बारामती, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, बारामती, ता.बारामती, जि. पुणे | तहसीलदार, बारामती, ता.बारामती, जि. पुणे | मौजे सोनगाव हद्दीतील फेरफार नं.१०७७५ नुसार झालेल्या सर्वे नं. व गट नंबर मधील वारस नोंदीच्या सातबारा उताऱ्याची नक्कल, जाब जबाबाची नक्कल इ. ४ मुद्दयांची माहिती | माहितीने समाधान झाले असल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २११४/८ पुणे | श्री. रोहिदास धोंडू बढे सुभद्रा दर्शन, भवानीनगर, प्रेम ऑटो समोर, कल्याण (प) | सहाय्यक जिल्हा पुनर्वसन अधिकारी, कुकडी प्रकल्प, पुणे | जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे | पुनर्वसन अधिकारी, नारायणगाव जुन्नर यांच्या कार्यालया-मधून मौजे गोळे गाव गट क्र.२१/१ बाबत श्री. धोंडू बढे यांचा प्रस्ताव नाकारण्या बाबतची कारणे. | अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनु.क्र. १ ते ५ अपिले (क्र. १, १४, १५१७, १९९७ व २११४ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र.१४/०९/पुणे मध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आठ दिवसांत माहिती उपलब्ध करून द्यावी. तसेच याबाबत अनुपालन अहवाल दि.३०.६.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. १७.६.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०/०९/ पुणे | श्री.सुनिलकुमार बावधनकर द्वारा चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सलटन्सी, हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड, कासारवाडी, पुणे-१४ | कक्ष अधिकारी, पंचायत समिती, कोरगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती, कोरगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा | सन १९८९ ते माहे डिसेंबर २००८ या कालावधीतीत मौजे तडवळे संमत वाघोली या गावातील विकास कामाच्या परीक्षणाची प्रत मौजे तळवडे संमत वाघोली येथील अ.क्र.२७२ मधील अनधिकृत बांधकामाबाबत माहिती | अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कोरेगाव यांनी दि.२६.०२.२००९ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| २ | ११/०९/ पुणे | श्री.सुनिलकुमार बावधनकर द्वारा चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सलटन्सी, हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड, कासारवाडी, पुणे-१४ | मुख्य कार्यकारी (प्रशासन), महाराष्ट्र शेती महामंडळ, पुणे-५३ | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र शेती महामंडळ, पुणे-५३ | सन १९८९ ते २००८ या कालावधीतील श्री.बबन सायबू क्षिरसागर, शेती कामगार यांचे सेवापुस्तक, निवृत्त वेतनविषयक लाभ या कालावधीत साखरवाडी मळा येथील शेती कार्यालयास प्रतिवर्षी मिळालेला विकास निधी व मदत निधी व श्री.मधुकर गायकवाड व्यवस्थापकीय संचालक यांच्या | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सेवापुस्तकाची छायाप्रत व आयकर विवरणपत्राची प्रत. | , |
| ३ | १२/०९ पुणे | श्री.सुनिलकुमार बावधनकर द्वारा चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सलटन्सी, हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड, कासारवाडी, पुणे-१४ | उप विभागीय अधिकारी, सातारा उपविभाग, जि.सातारा | अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा | सन २००० ते २००७ या कालावधीत आर.टी.एस. क्र.१६/२००६ शी आधारभूत कागदपत्रे व आदेशाची छायांकित प्रत तसेच तत्कालीन प्रांत अधिकारी यांची २००४ ते २००७ या कालावधीतील त्यांनी घेतलेली प्रवास बिले | अपिलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. सदर निर्णयातील मुद्दा क्र.२ बाबतच्या पूर्ततेचा अहवाल जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी सादर करावा. |
| ४ | १३/०९ पुणे | श्री.सुनिलकुमार बावधनकर द्वारा चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सलटन्सी, हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड, कासारवाडी, पुणे-१४ | गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा | अतिरक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, जि.सातारा | सन १९८९ ते २००८ या कालावधीतील मौजे तडवळे (सं.वाघोली) या गावाकरीता शासनाकडून विकास कामासाठी आलेले अनुदान या मधून झालेल्या विकास कामाचा ताळेबंद सध्या कार्यरत असणाऱ्या गटविकास अधिकारी यांनी सन २००३ ते २००६ व माहे मार्च २००७ ते माहे सप्टेंबर २००८ या कालावधीत घेतलेले प्रवास बिलाचा तपशील | अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद सातारा यांचा दि.०१.०१.२००९ चा निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ५ | ३४/०९ / पुणे | श्री.सुनिलकुमार बावधनकर द्वारा चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सलटन्सी, हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई- | कृषी अधिक्षक, महाराष्ट्र शेती महामंडळ, साखरवाडी मळा, साखरवाडी, | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र शेती महामंडळ, भांबुर्डा, पुणे | सन १९८९ ते २००८ या कालावधीत श्री.बबन सायबू (बाबू) मंडलकर, शेती कामगार यांचे सेवाविषयक, वेतनविषयक तपशिल | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुणे रोड, कासारवाडी, पुणे-१४ | ता.फलटण, जि.सातारा | | तसेच श्री.तु.की.दंडीले, स्थावर व्यवस्थापक यांच्या स्थावर मालमत्ता, शासनाकडून मिळालेली सवलती, प्रवासभत्ता बीले, आयकर विवरणपत्र इत्यादीबाबतची माहिती | |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ५ ( अपील क्रमांक १०/०९, ११/०९, १२/०९, १३/०९, व ३४/०९ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र.१२/२००९ मध्ये प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या दि.२६.१२.२००८ च्या आदेशानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा कार्यपूर्तता अहवाल आयोगास दि.२५.०६.२००९ पर्यंत सादर करावा.

पुणे
दि. २४. ०६-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १००३/ पुणे | श्री. शरद रामण्णा शेट्टी प्लॉट नं.१४, प्रेमप्रभा, वीरभद्रनगर, बाणेर, पुणे-१५ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे-१ | संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई | सन २००५-२००६ या कालावधीतील उपसंचालक कार्यालयातील मंजूर पदे व कर्मचाऱ्यांची माहिती | अपीलकर्त्याने विहित शुल्क जमा केल्यानंतर माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | २४५/ पुणे | श्री. गजानन भिकाजी कुंभार सरस्वतीनगर वस्तीचे कारखान्या-समोर, इंदापूर, जि. पुणे | जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे | अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासंबंधी माहिती | आवश्यक ती कागदपत्रे अपिलासोबत जोडलेली नाहीत. |
| ३ | २०३५ / पुणे | श्री. उमेश रमेश दुबे रा. प्रबुध्दनगर, इंदापूर रोड, बारामती, जि. पुणे | पुरंदर तालुका कृषि अधिकारी, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे | उप विभागीय कृषि अधिकारी, बारामती, जि. पुणे | कृषी खात्यामार्फत झालेल्या कामाची माहिती व हजेरी पत्रकांच्या प्रती याबाबत ४ मुद्यांची माहिती | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. विशेष अपील निर्गत कार्यक्रमा-तील प्रपत्रात व अपील निर्णयातही अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध असल्याचे नमूद |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | केले आहे. मागितलेली माहिती विस्तृत आहे. रू.५,९५,६०४/- एवढी मोठी रक्कम दारिद्र्य रेषेखालील एका माहितीसाठी खर्ची घालणे साधनसामुग्रीचा प्रमाणाबाहेर वापर (एकाच व्यक्तीसाठी ) ठरेल. अपीलकर्त्याने अभिलेखांचे अवलोकन करावे. त्यातील १०० प्रती पर्यंतची हवी ती माहिती त्यांना नि:शुल्क द्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील नमूद केलेली अपिले (अनु. क्र. १००३, २४५ व २०३५ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १६.६.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०१० | श्री.सुभाष वसंत अष्टेकर सोमवार पेठ, डबास गल्ली, तासगाव, जि.सांगली | जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली | निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली | सन २००७ व २००८ मध्ये दगडखाण भाडेपट्टया झालेल्या सर्व भाडेपट्टाधारकांची यादी, त्यांच्या अर्जासोबतची कागदपत्रे | आवश्यक कागदपत्रे सोबत जोडलेली नाहीत. |
| २ | १०११ | श्री.एस.एस.संकपाळ शिवअव्हेन्यु, प्लॅट क्र.२ ,१०० फुटी रोड, साईमंदिराच्या समोर, सांगली | चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली | निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली | लिपिक-टंकलेखक या पदाकरिता दि. १५.६.०८ रोजी घेण्यात आलेल्या अनुसूचित जाती महिला प्रवर्गातील झालेल्या लेखी परिक्षेबद्दल. | आवश्यक कागदपत्रे सोबत जोडलेली नाहीत. |
| ३ | १०१२ | श्री.सुरेश जोतीराम म्हमाने विरंगुळा, साखर कारखान्यासमोर, सांगली | दैनिक सकाळ, राममंदिर कॉर्नर शिवपॅव्हेलियन, सांगली | दैनिक सकाळ, राममंदिर कॉर्नर शिवपॅव्हेलियन, सांगली | केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम नुसार जाहीर करावयाची माहिती तसेच कार्यालयाची माहिती अशा पाच मुद्यांची माहिती. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत संबंधित संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण ' ठरत नाही. |
| ४ | १०१३ | श्री.सुरेश जोतीराम म्हमाने विरंगुळा, साखर कारखान्यासमोर, सांगली | दैनिक तरुण भारत, एस.टी.स्टॅन्ड रोड, सांगली | दैनिक तरुण भारत, एस.टी.स्टॅन्ड रोड, सांगली | केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम नुसार जाहीर करावयाची माहिती तसेच कार्यालयाची माहिती अशा पाच मुद्यांची माहिती. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत संबंधित संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण ' ठरत नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | २२ | श्री. सुरेश जोतीराम म्हमाने विरंगुळा, साखर कारखाना समोर, सांगली | दैनिक केसरी, औद्योगिक वसाहत, सांगली | दैनिक केसरी, औद्योगिक वसाहत, सांगली | केंद्रिय माहिती. अधिकार अधिनियम २००५ चे कलम नुसार जाहीर करावयाची माहिती तसेच कार्यालयाची माहिती अशा पाच मुद्यांची माहिती. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत संबंधित संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण ' ठरत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ५ (क्र. १०१०, १०११, १०१२, १०१३, व २२/२००९ सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७-०६-२००९.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, यांच्यासमोर

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संदीपसिंह विजयसिंह राजपूत
१२०, ज्ञानेश्वर मंदिर, सुभाषनगर, धुळे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक,
बिनतारी संदेश कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गृह पोलीस निरीक्षक,
बिनतारी संदेश कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संदीपसिंह विजयसिंह राजपूत
१२०, ज्ञानेश्वर मंदिर, सुभाषनगर, धुळे

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक,
बिनतारी संदेश कार्यालय, पुणे प्रतिनिधी श्री.पां.कि.घोडेकर

**जन माहिती अधिकारी** तथा गृह पोलीस निरीक्षक,
बिनतारी संदेश कार्यालय, पुणे श्री.द.ज्ञा.पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.८.२००६, २१.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.९.२००६, ७.१०.२००६ २८.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.५.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००५ मध्ये बिनतारी संदेश विभागाच्या बिनतारी यंत्रचालक पदासाठी झालेली परीक्षा व निवड प्रक्रिया याबाबतची १० मुद्दयाची माहिती | |

## विवेचन

सन २००५ मध्ये बिनतारी संदेश विभागाच्या बिनतारी यंत्रचालक पदासाठी झालेली परीक्षा व निवड प्रक्रिया याबाबतची १० मुद्दयाची माहिती अपीलकर्ता श्री.संदीपसिंह विजयसिंह राजपूत यांनी जन माहिती अधिकारी तथा गृह पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश यत्रणा, पुणे यांच्याकडे मागितली होती. या माहितीसाठी रु.५८९५०/- एवढे शुल्क भरण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. त्यानंतर त्यातील काही मुद्दयांचीच माहिती आपल्याला हवी असल्याचे श्री.राजपूत यांनी कळविले. अशाच पध्दतीने शुल्क कळविल्यानंतर ठराविक मुद्दयांचीच माहिती हवी असल्याचे श्री. राजपूत कळवीत राहिले. शेवटी त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी फक्त खुल्या प्रवर्गातील निवड झालेल्या ४१ उमेदवारांच्या निबंधाच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीची मागणी केली. व तेवढ्यापुरते शुल्क भरले. उत्तरपत्रिकेच्या प्रती देता येणार नसल्याचे कळवून जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती नाकारली. त्याविरुध्द श्री.राजपूत यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यात खुलासेवजा प्रश्नांची विचारणा असल्यामुळे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी काही मुद्दयांची माहिती देऊन स्पष्टीकरण दिले. परंतु अपुरी माहिती मिळाल्याच्या कारणावरुन श्री.राजपूत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

निवड झालेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकेच्या [illegible] पदी [illegible] अपिलावरील उत्तरात एक पद रिक्त दर्शविलेले असल्यामुळे या रिक्त पदी आपली नियुक्ती करण्याचे आदेश देण्याची मागणीही श्री.राजपूत यांनी आयोगाकडे केली आहे.

आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. तीनही घटकांमध्ये एकमत झाले नाही, यास्तव अपील आयोगासमोर सुनावणीसाठी घेण्यात आले.

त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे दिली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा गृह पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश कार्यालय, पुणे श्री.द.जा.पवार यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. त्याचीच पुनरावृत्ती त्यांनी आयोगापुढील सुनावणीत केली. त्रयस्थ पक्षाची संमती घेतल्यानंतर माहिती देण्यात येईल, असे निवेदन त्यांनी केले. मात्र परीक्षेस बसलेल्या व्यक्तींच्या उत्तरपत्रिका ही निवड प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या दृष्टीने त्रयस्थ पक्षाची माहिती मानता येणार नाही. त्यात कोणत्याही व्यक्तिगत स्वरुपाचा भाग नसून एकाच परीक्षेला बसलेल्या उमेदवारांच्या मूल्यमापनाचा तुलनात्मक विचार खाजगी स्वरुपाचा मानता येणार नाही. म्हणून ही माहिती द्यावी लागेल, असा मौखिक निर्णय आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. या संदर्भात माहिती देण्यासाठी शुल्क भरण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.राजपूत यांना कळविले, परंतु आपल्याला विहित मुदतीत माहिती मिळाली नसल्याने निःशुल्क मिळावी, अशी विनंती श्री.राजपूत यांनी दि.१०.१०.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला केली. माहिती देण्यास झालेल्या विलंबाला मुख्यतः जन माहिती अधिकारी जबाबदार नाहीत, तर ठरवलेले शुल्क कळविल्यानंतर, श्री.राजपूत यांनी केलेला पत्रव्यवहार कारणीभूत आहे, हे उभय बाजूंनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. तरीही उत्तरपत्रिकेच्या प्रती द्याव्यात की नाहीत हा अन्वयार्थाचा मुख्य मुद्दा असल्यामुळे आयोगाने दिलेल्या निर्णयानुसार माहिती निःशुल्क द्यावी, असा आदेश आयोगाने अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश कार्यालय, पुणे यांना दि.१५.१२.२००८

रोजी दिला.

त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.कार्ल डिसोझा यांनी माहिती स्वीकारण्याबाबत श्री.राजपूत यांना दि.२२.१२.२००८ रोजी पत्र पाठविले, त्यांनी दि.१३.१.२०० रोजी कळविल्याप्रमाणे एकूण ४१३ उत्तरपत्रिकांच्या प्रती (१६५ पृष्ठे) श्री.डिसोझा यांनी दि.१४.१.२००९ रोजी श्री.राजपूत यांना पाठविल्या. मात्र श्री.राजपूत यांना दि.१३.१.२००९ च्या फॅक्स पत्रामध्ये आणखी काही मुद्दयांची माहिती या अपिलाचा भाग म्हणूनच मागितली, त्यासाठी नव्याने अर्ज करण्यास श्री.डिसोझा यांनी कळविले. मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती अपिलात व अन्य पत्रव्यवहारात करुन मूळ अर्जाचाच तो भाग असल्याचे दर्शविण्याचा अपीलकर्ता श्री.राजपूत यांचा प्रयत्न कागदपत्रांमधून दिसतो, ही कृती अत्यंत अयोग्य व आक्षेपार्ह आहे. त्याबाबत श्री.राजपूत यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१६.६.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२२ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.चेतन उर्फ सोमनाथ राजेंद्र बागल<br>मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि.पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>बारामती विभाग, बारामती, जि.पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | गैरहजर |

## सुधारीत आदेश

**वाचा : आदेश दि.३१.०७.२००८**

## विवेचन

अपीलकर्ता श्री.चेतन उर्फ सोमनाथ राजेंद्र बागल यांचे अपील आदेशामध्ये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती विभाग, बारामती, जि.पुणे यांना 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये गैरहजर दर्शविण्यात आले होते व या गैरहजेरीबाबत त्यांचा लेखी खुलासा मागविण्यात आला होता.

त्यानुसार जन माहिती अधिकारी डॉ. श्रीकांत परोपकारी यांचेकडून लेखी खुलासा दि.२२.०८.२००८ रोजी प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांचे आठवडा डायरीची छायाप्रत आयोगास सादर केलेली आहे. तसेच 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये आयोगाकडील एका प्रपत्रामध्ये डॉ.परोपकारी यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

दिनांक २४.०६.२००८ रोजीचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये जन माहिती अधिकारी व अपीलकर्ता यांनी एकच प्रपत्र भरणेऐवजी दोन वेगवेगळे प्रपत्रे भरलेली आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रपत्रामध्ये Absent असे लिहून स्वाक्षरी केलेली आहे. अन्य रकाने भरलेले नाहीत. अपीलकर्त्याच्या प्रपत्रात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर असल्याचे नमूद आहे. दोन स्वतंत्र प्रपत्रे भरण्यात आल्याने जन माहिती अधिकारी गैरहजर असल्याचे दर्शविले गेले आहे. यास्तव जन माहिती अधिकारी यांची उपस्थिती 'गैरहजर' ऐवजी 'हजर' अशी सुधारीत करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये जन माहिती अधिकारी उपस्थित असल्याने गैरहजेरीबाबत त्यांना देण्यात आलेली समज रद्द करण्यात येत आहे.

पुणे
दिनांक :३०-०६-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०६/ पुणे | सौ.मंजिरी सुरेश कुलकर्णी बंगला नं.२७, गृहशिल्प हौ.सो., बागरोझा, दिल्ली गेट, साताळकर हॉस्पीटलजवळ, अहमदनगर | माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-७ | कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-७ | दि.०९.०९.२००८ रोजी अधीक्षक जिल्हा पोलीस, अहमदनगर यांना रॅंगिंग संबंधांत दिलेल्या अर्जाची प्रत आपणास दिलेली होती. या अर्जाबाबतची कार्यवाही | अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव यांचे दि.२०.०१.२००९ रोजीचे आदेश कायम करण्यात येत आहेत. |
| २ | १०७/ पुणे | श्री.शब्बीर कमरुद्दीन सय्यद मु.पो.मुजावर-वाडा, बारामती, ता.बारामती, जि.पुणे | मुख्य लिपिक, बारामती नगर परिषद, ता.बारामती, जि.पुणे | मुख्याधिकारी, बारामती नगर परिषद, ता.बारामती, जि.पुणे | बारामती नगरपरिषदेच्या मंजूर विकास योजनेतील वार्ड नं.२, सिटी सर्व्हे नं.१६३ या जमीनीवरील आरक्षणाबाबत एकूण ७ मुद्यांची माहिती | अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ३ | १०८/ पुणे | श्री.गजानन भिकाजी कुंभार सरस्वतीनगर, इंदापूर, बर्फाच्या कारखान्यासमोर, इंदापूर, जि.पुणे | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे | मंडल अधिकाऱ्याकडून प्रकरण क्रमांक व जावक क्रमांक दिल्यानंतर अहवाल किती दिवस जवळ ठेवला जातो व पुढे केव्हा पाठविला जातो ? | अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ४ | १०९/ पुणे | श्री.काशिनाथ त्रिंबक साने | कक्ष अधिकारी, | अवर सचिव, गृह विभाग | संचालक वर्ग १, अंगुलीमुद्रा केंद्र ह्या | विषयांकित बाब ही माहितीचा अधिकार |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १११,शुक्रवार पेठ, गणेश अपार्टमेंट, ब-२, बदामी हौदाजवळ, पुणे-२ | गृह विभाग (पोल नं.१ व ४), मंत्रालय, मुंबई-३२ | (पोल नं.१ व ४), मंत्रालय, मुंबई-३२ | पदाचा मानीव दिनांक मिळून शासकीय नियमानुसार फरकाची रक्कम मिळणेबाबत | अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही व याबाबत यापूर्वीच आयोगाने निर्णय दिला आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ४ ( क्रमांक १०६, १०७, १०८ व १०९ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. २४-०६-२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे "विशेष अपील निर्गत कार्यक्रम" दि.१६.०७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११० / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.नामदेव बाबासाहेब खरात,<br>नितीराज निवास, निरा,<br>ता.पुरंदर, जि.पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका निरीक्षक,<br>भूमी अभिलेख कार्यालय,<br>सासवड (पुरंदर), ता.पुरंदर, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधिक्षक,<br>भूमी अभिलेख यांचे कार्यालय,<br>पुणे -१ | हजर |

अपीलकर्ता श्री.नामदेव बाबासाहेब खरात,नितीराज निवास, निरा, ता.पुरंदर, जि.पुणे यांनी दि.२२.०२.२००७ रोजीचे अधिक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांच्याकडे दिलेला अर्ज व त्यावर झालेल्या कार्यवाहीची कागदपत्राच्या तपशीलासह मागणी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,भूमी अभिलेख यांच्याकडे केली होती.

उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता यांची मागणी नोंद करणे वा स्थळ निरीक्षण करणे याची आहे. या बाबी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९,१५० नुसार अर्धन्यायिक सदरात येतात. अशा कार्यवाहीची मागणी माहिती चा अधिकार अधिनियम

२००५ अंतर्गत मोडत नाही. मात्र कार्यवाहीच्या अनुषंगाने असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास द्यावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. श्री.खरात यांच्या अर्जावरीज कार्यवाहीबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास आठ दिवसात द्यावी व तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दिनांक :** २४-६-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जुगल श्रीनिवासजी राठी
डी-३, कांचनबन सोसायटी, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा महाव्यवसथापक,
पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रम, पुणे-३७
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका(परिवहन), निगडी, पुणे ४११०४४ उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा कामगार व जनता संपर्क अधिकारी,
पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रम, पुणे-३७
(२)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक वाहतुक अधीक्षक,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका(परिवहन), निगडी, पुणे ४११०४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९२ +१२२२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जुगल श्रीनिवासजी राठी
डी-३, कांचनबन सोसायटी, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.७.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पीसीएमटी व पीएमटी बस शेड व बस थांबे, पाट्या संदर्भात मार्गनिहाय माहिती. |
|---|---|

## विवेचन

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील बस थांबे व त्यावरील शेडस्‌बाबतची माहिती अपीलकर्ता श्री.जुगल श्रीनिवासजी राठी यांनी जन माहिती अधिकारी तथा कामगार व जनता संपर्क अधिकारी, पीएमटी, पुणे-३७ व सहाय्यक वहातुक अधीक्षक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (परिवहन), निगडी, पुणे यांच्याकडे मागितली होती. शहरातील तापमान सातत्याने ४० अंशापुढे असल्यामुळे उष्माघात होऊन बस प्रतिक्षेत थांब्यावरील प्रवाशांच्या जिवितास धोका संभवतो. सबब माहितीचा अधिकार अधिनियम कलम ७(१) अन्वये ४८ तासांच्या आत माहिती मिळावी, अशी मागणी श्री.राठी यांनी केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी सर्वसाधारण अर्जासाठी असलेल्या तीस दिवसांच्या मुदतीत उत्तर दिले, परंतु अपुरी व असमाधानकारक माहिती मिळाल्याच्या कारणावरुन श्री.राठी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक, पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रम, पुणे व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पिंपरी चिंचवड, महानगरपालिका परिवहन उपक्रम, निगडी, पुणे-३७ यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे परंतु श्री.राठी यांना अपेक्षित असलेला तपशील लक्षात घेता 'त्यांना आवश्यक असणारी माहिती सखोल अभ्यास करुन उपलब्ध करुन द्यावी,' असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी , पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिवहन (पीसीएमटी), उपक्रम, निगडी, पुणे श्री.व्ही.व्ही. मोरे यांनी दिला, तर श्री.राठी यांनी मागितलेल्या तक्त्यानुसार माहिती तयार करण्यास दोन महिन्यांचा कालावधी लागेल, असे वाहतूक व्यवस्थापक, वाहन व्यवहार, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना कळविले व त्यांनी तसे श्री.राठी यांना कळविले. आपल्या अर्जात नमूद केलेल्या कालावधीत माहिती देणे शक्य नसल्याचे पत्र आपणास समक्ष सादर केलेले आहे. त्यावेळी परिवहन उपक्रमाकडील संबंधित विभागामार्फत

सर्व माहिती व रजिस्टर जी उपलब्ध आहेत ती आपणास दाखविली होती. आपल्या बरोबर संबंधित विभागाकडील प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेनुसार माहिती तयार करण्याचे काम सुरु केलेले आहे. त्याप्रमाणे पुढील पूर्तता करण्यात येत आहे,' असे पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे जन माहिती अधिकारी तथा कामगार व जनता संपर्क अधिकारी श्री.दिपकसिंह परदेशी यांनी श्री.राठी यांना कळविले. त्याविरुध्द श्री.राठी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

राज्य माहिती आयोगाने दिनांक १६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या दोन्ही अपिलांचा समावेश होता. यामध्ये तीनही घटकात एकमत न झाल्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

दरम्यानच्या काळात पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिवहन उपक्रम व पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रम यांचे एकत्रीकरण होऊन 'पुणे महानगरपालिका परिवहन महामंडळ मर्यादित' या नावाने कंपनी सुरु झाली. पाट्या नसलेल्या सर्व थांब्याच्या ठिकाणी पाट्या लावण्याच्या व नसलेल्या बस थांब्यांच्या उभारणीच्या कालबध्द नियोजनाची माहिती दि.३१.७.२००८ पर्यंत देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी श्री.नितीन घोगरे व अपिलीय प्राधिकारी तथा सहव्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ, पुणे श्री.ए.वाय.कारचे यांनी प्रपत्रात नमूद केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी उपलब्ध असलेली माहिती दिली. परंतु पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या अधिकाऱ्यांनी मात्र मूळ अर्जाची गंभीरपणे दखल घेतली नाही म्हणून पिंपरी चिंचवड परिवहन महामंडळाच्या(पीएसीएमटी) अधिकाऱ्यांबाबत शास्तीची मागणी नसल्याचे व पुणे महानगरपालिका वाहन व्यवहार (पीएमटी) विभागाच्या जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती करण्याची मागणी श्री.राठी यांनी प्रपत्रात नमूद केल्याप्रमाणेच आयोगापुढील सुनावणीतही केली.

प्रपत्रात नमूद केल्याप्रमाणे १५ दिवसात श्री.राठी यांना माहिती दिल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी श्री.ए.वाय.कारचे यांनी दि.२९.७.२००८ च्या पत्रान्वये संबंधित माहितीच्या प्रतीसह आयोगाला सादर केला. मात्र ही माहितीही मोघम व संदिग्ध आहे, अशी तक्रार श्री.राठी यांनी दि.२९.८.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली.

(१) पाट्या नसलेल्या सर्व थांब्यांच्या ठिकाणी पाट्या लावण्याच्या कालबध्द नियोजनाची माहिती ३१ जुलै २००८ पर्यंत अपीलकर्त्याला द्यावयाची.

पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्यामार्फत ज्या ज्या ठिकाणी रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे त्या ठिकाणी पाट्या लावण्याचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे त्याची यादी सोबत सहपत्रित केलेली आहे. ज्या ठिकाणी विकासाचे काम पूर्ण झालेले नाही व त्या कामाचाच कालावधी पीएमपीएमएलच्या हाती व निश्चित नसल्याने त्या ठिकाणी पाट्या लावण्याचा कालावधी नंतरच निश्चित होईल. या कामी काढण्यात आलेल्या पाट्यांची तपशीलवार माहिती सोबत सहपत्रित केलेली आहे. ज्या ठिकाणी थांबा पाटी चोरीस गेलेली आहे अथवा खराब झालेली आहे अशा ठिकाणी नवीन पाट्या सदर बाब लक्षात आल्यानंतर सुमारे चार महिन्याचे कालावधीत बसविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे, त्याची यादी सोबत सहपत्रित केलेली आहे.

(३) नव्याने बांधावयाच्या १२७० बसशेडच्या यादीमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील ४९२ ठिकाणे आहेत. या ठिकाणी महामंडळाने बसशेड उभारणेकामी महापालिका आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्याकडे परवानगी मागितली असता तत्कालीन महापालिका आयुक्त यांनी त्यांच्याकडील जा.क्र.आ.कक्ष/न/कावि/१२०/२००८, दि.५.५.२००८ रोजीच्या पत्रान्वये पिंपरी-चिंचवड हद्दीतील बसशेडबाबत आपल्या बीओटीच्या प्रकल्पामध्ये पिंपरी-चिंचवड शहरात बसस्टॉपचा अंतर्भाव करु नये असे कळविले आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील बसशेड उभारण्याचा निश्चित कालावधी सांगणे अडचणीचे आहे.

अशा स्वरुपाची अयोग्य व असमाधानकारक माहिती देण्यात आल्याचे श्री.राठी यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. मे २००७ ते जुलै २००८ अशा पंधरा महिन्यांनंतरही आवश्यक मागितलेली माहिती मिळाली नाही. पाटी व शेडअभावी लाखो प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत. निश्चित कालबध्द नियोजनाची समाधानकारक माहिती मिळावी, असे श्री.राठी यांनी या निवेदनात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता संबंधित विषय ४८ तासात माहिती देण्याइतका जीवन-मरणाचा नाही, परंतु नागरिकांच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्त्वाचा मात्र निश्चितच आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिवहन वाहन व्यवहार यांचे जन माहिती अधिकारी श्री.एन.एन.घोगरे यांनी माहिती देण्यात अधिक तत्परता दाखविली, तशी पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे जन माहिती अधिकारी श्री.दिपकसिंह परेदशी यांनी दाखविली नाही. मात्र दोघांचीही उत्तरे विहित मुदतीत आहेत. विषयाचे स्वरुप लक्षात घेता बस थांब्यांबाबत नियोजन करुन तातडीने कार्यवाही करावी, अशा स्वरुपाची मागणी श्री.राठी यांच्या निवेदनात अंतर्भूत असून संभाव्य कार्यवाहीची नेमकी माहिती श्री.राठी यांना अपेक्षित आहे, मात्र जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केलेली या विषयाची प्रक्रिया लक्षात घेता, 'काम संपण्याचा निश्चित कालावधी आज सांगता येणार नाही, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील ४९२ थांब्यांबाबत आयोगाच्या मान्यतेनंतर कार्यवाही करण्यात येईल,' ही जन माहिती अधिकाऱ्याची विधाने तांत्रिकदृष्ट्या योग्य आहेत. त्यामुळे त्यांना शास्ती लावण्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे. परंतु नागरी हिताचा विचार करता केवळ तांत्रिकतेवर भर न देता नेमकेपणाने नियोजन व कार्यवाही करण्याची श्री.राठी यांची मागणी व्यापक सार्वजनिक हिताची आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. मूळ मागणीपासून पंधरा महिन्यातही अशा स्वरुपाची कार्यवाही महानगरपालिका करीत नाही, व नेमके नियोजन करुन नागरिकांना सादर करु शकत नाही, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांतून दिसून येते. नागरी हिताच्या दृष्टीने ते भूषणावह नाही. मूळ विषयाला आता दोन वर्षांचा कालावधी होऊन गेला आहे. या दोन वर्षांत केलेल्या कार्यवाहीची

माहिती पीएमपीएमएलचे कार्यकारी संचालक यांनी श्री.राठी यांना म्हणजेच पर्यायाने नागरिकांना देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) पीएमपीएमएलचे कार्यकारी संचालक यांनी बसथांब्यांची उभारणी व बसथांब्यांवरील पाट्या लावणे याबाबतच्या सद्यस्थितीची कार्यवाहीच्या निश्चित तारखांसह नेमकी माहिती आठ दिवसांत अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.६.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२१९/ पुणे | श्री.संजीव नागनाथ माळी देवेश्री हाईटस, फेज २, फ्लॅट नं.८, मंत्री टाऊनशीप रोड, प्रोग्रेसिव्ह मॉडेल कॉलनी, वैदूवाडी, हडपसर, पुणे-१३ | मुख्याध्यापक, हडपसर विद्यालय, रामटेकडी, हडपसर, पुणे-१३ | सचिव, फुले एज्युकेशन सोसायटी, इंदापूर जंक्शन, पो.लासुर्णे, ता.इंदापूर, जि.पुणे | फुले एज्युकेशन सोसायटी, पुणे या संस्थेच्या हडपसर विद्यालय व ज्युनि.कॉलेजच्या इमारत बांधकाम खरेदी व शालेय कामकाजाची अनुषंगिक माहिती | अर्जदार श्री.माळी यांनी माहिती व्यक्तिशः हस्तपोच घेणार असल्याचे मूळ अर्जामध्ये नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी तथा प्र.मुख्याध्यापक यांना त्यानुसार माहिती उपलब्ध करुन द्यावी. |
| २ | १३४६/ पुणे | श्रीमती प्रमोदिनी यशवंत सिधये फ्लॅट नं.४०२, क्लोवर व्हिलेज, शेलटेहॅम कोर्ट, सी.एच.एस., ६६/६७, वानवडी, पुणे-४० | कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ | अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई -३२ | कै.यशवंत प्रभाकर उर्फ बाबा सिधये (जन्मतः अपंग) (कर्णबधीर) आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू यांचेपेक्षा जगात / भारतात व महाराष्ट्रात एक तरी मॅच जास्त खेळलेला जन्मतः अपंग | मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे दि.२२.०८.०६ चे उत्तर पत्र क्र.केंमाअ-३२०६/ प्र.क्र.१७९/क्रीयो-२, दि.२२.०८.०६ योग्य आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | (कर्णबधीर) आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू आहे का? त्याअनुषंगीय क्रिकेटपटूची माहिती. | |
| ३ | १७८१/ पुणे | श्री.दगडू बाबूराव शिंदे ५८७, बुधवार पेठ, पुणे -२ | निवासी नायब तहसीदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे - २ | तहसीदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे - २ | मौजे रहाटणी ता.हवेली, जि.पुणे येथील स.न.३३/१/३/१ या ७/१२ वरील फेरफार नंबर १४२९, ५४९४, ५४९५, ५९८१, ५९८२, ५९६९, ९४५, ११३५०, ११५१९ चे फेरफार उतारे सत्यप्रती | अपीलकर्त्याची अर्जावर स्वाक्षरी नसल्याने अपील नाकारण्यात येत आहे. |
| ४ | २१०७/ पुणे | श्री.दशरथ नानासाहेब राऊत मु.पो.खांडज, ता.बारामती, जि.पुणे | सचिव, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव बु.ाा ता.बारामती, जि.पुणे | चेअरमन, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव बु.ाा ता.बारामती, जि.पुणे | जानेवारी २००५ पासून डिसेंबर २००७ पर्यंत, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव बु.ाा , ता.बारामती, जि.पुणे या संस्थेने न्यायालयीन याचिकांसाठी खर्च केलेल्या रकमेची तपशीलवार माहिती. | अपीलकर्त्यास माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी तथा सचिव, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव यांनी दि.१६.११.०८ चे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' चे प्रपत्रामध्ये नमूद केले आहे. तथापि अपूर्ण माहिती मिळाल्याचे अपीलकर्ता श्री.राऊत यांनी नमूद केलेले आहे. मूळ अर्जानुसार न मिळालेल्या माहितीचा तपशील |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | त्यांनी जन माहिती अधिकारी यांना द्यावा. त्यानंतर माहिती देऊन पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी यांनी आयोगास ८ दिवसांचे आत सादर करावा. |
| ५ | २२०६/ पुणे | श्री.हरिश्चंद्र पुंडलिक भरते फ्लॅट नं.७, श्री शुभकामना सोसायटी, सी.टी. एस. नं.५२५, येरवडा, पुणे-६ | जन माहिती अधिकारी, शहर अभियंता, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय, पुणे-५ | अधीक्षक, शहर अभियंता, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय, पुणे-५ | श्री शुभकामना सोसायटी सी.टी.एस.नं.५२५ येरवडा येथील अनधिकृत बांधकाम, सोसायटीचे प्रवेशद्वार बंद केल्याची माहिती व पार्किंगमध्ये बेकायदा गोडाऊन बनविल्याची माहिती | १) अर्जातील मूळ मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची आहे. २) अपीलकर्त्याच्या दि.०५.०३.०८ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसात अपीलकर्त्यास द्यावी. |
| ६ | २२४९/ पुणे | डॉ.शरदचंद्र चिंतामण अंबिके २२७, सोलापूर रोड, पुणे २८ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, ता.हवेली, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, ता.हवेली, जि.पुणे | मूळ माहिती अर्जावर संबंधित राज्य माहिती अधिकाऱ्यांनी काहीही माहिती कळविली नाही, त्याबद्दल मुदत किती धरण्यात येईल व प्रथम अपील अधिकारी कोण? तद्नंतर अपील फेटाळण्यात येईल का? | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत. अपीलकर्त्याला कायदा सार्वजनिकरीत्या उपलब्ध आहे. |
| ७ | २२८२/ पुणे | श्री.चंद्रकांत देवराम कांबळे सहाय्यक | वरीष्ठ उपसहायक पोलीस | विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्था.), | पोलीस महासंचालकांचा कायदेशीर | अपिलीय प्राधिकारी यांचे दि.१५.०३.०८ चे आदेश कायम |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सरकारी अभियोक्ता, मिरज लोहमार्ग न्यायालय, ४४२ जुना बाजार, खडकी, पुणे-३ | महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई १ | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई १ | सल्लागार या पदाची आवश्यक पात्रता धारण न करणारी व्यक्ती सदरचे कामकाज करीत असल्याबाबत व सदरचे पद न भरणे इत्यादीबाबत अनुषंगिक एकूण १५ मुद्यांची माहिती. | करण्यात येत आहेत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ७ (अपील क्र.१२१९, १३४६, १७८१, २१०७, २२०६, २२४९ व २२८२ /पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र.१२१९/पुणे व अपील क्र.२१०७/पुणे प्रकरणी विहित कालमर्यादेत माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास मुदतपूर्तीनंतर आठ दिवसात सादर करावा, अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीसह अन्य तद्नुषंगिक कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २४ -०६-२००९

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात आले आहे.

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३२९/ सोलापूर | श्री. वसंत अर्जुन नारायणकर मु. पो. मार्डी, ता. उत्तर सोलापूर , जि. सोलापूर | उपकार्यकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग - १, जिल्हा परिषद सोलापूर | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग - १, जिल्हा परिषद, - १ सोलापूर | सोलापूर माडी रोड पर्यंतचा डांबरीकरण रस्ता २५ वर्षापुर्वी आमदार फंडातून झाला आहे त्याबाबतची टेंडर मोजमाप पुस्तीका देयक रस्ते, विकास योजना माहिती, १९६१ -८१, ते २००१- २०२१ रस्त्यांची यादी, तसेच तालुक्यांचा नकाशा, सन १९८१, ९१ व ०१ च्या जनगनेनुसार तालुक्यातील गावांची यादी. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक शुल्क लावलेले नाही. |
| २ | १३६४/ सोलापूर | श्री. रविंद्र जवाहरलाल संचेती मु.पो. ता. करमाळा, वेताळपेठ, जि. सोलापूर | निवासी नायब तहसिलदार, करमाळा, जि. सोलापूर | तहसिलदार करमाळा, जि. सोलापूर | दि. १५.०६.०८ रोजी शिल्लक असलेला गॅस सिलेंडर स्टॉक, दि. १८.०६.२००८ ते १५.०८.०८ या कालावधीतील किती स्टॉक पुरवठा झाला त्याची संख्या, ज्या कार्डधारकांना वितरण केले त्याची नावे, पत्ते कार्ड नंबर नियमानुसार सिलेंडर मागणी केल्यानंतर किती दिवसांत पुरवठा मागणी केल्यानंतर किती दिवसांत पुरवठा केला जातो याची माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १४१२/ सोलापूर | श्री. अशोक जगन्नाथ खाडे मु.पो. कुर्डूवाडी, पंढरपूर रोड, प्रांत कचेरी मागे,कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | चेअरमन / सचिव, संत रोहिदास ग्रामिण बिगरशेती सह. पतसंस्था म., बारलोणी, ता.माढा जि. सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | दि. २८.०७.९९ रोजीच्या पतसंस्था चेअरमन व संचालक मंडळ यादी, त्याचे राजीनामे, संचालक, चेअरमन बदलण्याची कारणे, सन २००७ - ०८ ची संचालक व चेअरमन यादी, संचालक व नातेवाईक यांना वाटप केलेल्या कर्ज खात्याची यादी, पतसंस्थेच्या पोट नियमानूसार एका लाभार्थ्याला किती वाटप करण्याचा अधिकार आहे. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँका, पतसंस्था यांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटिशन ५६६६ /२००७ मध्ये दिलेला आहे. |
| ४ | १४१३/ सोलापूर | श्री. अशोक जगन्नाथ खाडे मु.पो. कर्डुवाडी, पंढरपूर रोड, प्रांत कचेरी मागे,कुर्डुवाडी, ता . माढा, जि. सोलापूर | चेअरमन / सचिव संत रोहिदास ग्रामिण बिगरशेती सह. पतसंस्था म., बारलोणी, ता.माढा जि. सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | दि. २८.०७.९९ रोजीच्या पतसंस्था चेअरमन व संचालक मंडळ यादी व बंधपत्र, त्याचे राजीनामे, संचालक, चेअरमन बदलण्याची कारणे, सन २००६ ते २००८ मधील चेअरमन व संचालक मंडळ यादी, दि. १३.०९.०५ रोजी रू ५,००,०००/- घेतलेल्या कर्जातून किती सभासद भाग घेतला, दि. २९.१२.०७ रोजी अपीलकर्ते यांनी सभासद भाग मोडण्याबाबत दिलेल्या अर्जाची प्रत. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँका, पतसंस्था यांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटि[illegible]न ५६६६ /२००७ मध्ये दिलेला आहे. |
| ५ | १४५७/ सोलापूर | श्री. शिवाजी तुकाराम पाटील रा. फडतरी, ता.माळशिरस, जि. सोलापूर | शाखा अभियंता, महा. राज्य. विद्युत वितरण कंपनी, नातेपूते, ग्रामीण विभाग, फडतरी, ता. माळशिरस, जि. सोलापूर | कार्यकारी अभियंता, महा. राज्य विद्युतवितरण कंपनी अकलूज, ता माळशिरस, जि. सोलापूर | फडतरी येथील वायरमन श्री. वाघ अधिकृत आहेत का, त्याच्या विरूध्द बदली बाबत ग्रामपंचायत ने ठराव दिला आहे का, असल्यास त्यावर काय कारवाई केली, सध्या फडतरी येथे कोण वायरमन आहे, ग्राहक क्र. ३३९२००२६०४९७ दोन महिन्यापासून बंद असून ग्राहकाने अर्ज देऊन चालू केला आहे, किंवा बंद असल्याचे कारण व इतर माहिती. | अपीलकर्त्याने मूळ अपील अर्ज सादर न करता झेरॉक्स प्रत सादर केली आहे, तसेच सोबत विहित शुल्कही लावलेले नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनु क्र. १ ते ५ (अपील क्र. १३२९, १३६४, १४१२, १४१३ व १४५७) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र १४१२ व १४१३ मध्ये नियंत्रक अधिकारी म्हणूण सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या सबंधित कार्यालयांकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, ती त्या त्या कार्यालयांनी अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानूसार कार्यवाही करावी,

पुणे
दि. २५.६.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मधुसूदन प.लिमये
३७९, शनिवार पेठ, कन्या शाळेसमोर, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता (पथ),
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी, पथ,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९५ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधुसूदन प.लिमये
३७९, शनिवार पेठ, कन्या शाळेसमोर, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता (पथ),
पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.एन.एस.बारापात्रे

**जन माहित्ती अधिकारी** तथा माहिती अधिकारी, पथ,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.एस.व्ही.संकपाळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.११.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>शनिवार पेठ येथील खरे चौक ते केसरीवाडाचे दरम्यान होणाऱ्या डांबरीकरणाबाबत तसेच पदपथाबाबतच्या योजनेच्या कागदपत्रांची पाहणी करण्यासाठीच्या प्रती | |

## विवेचन

रस्त्याच्या पदपथाचे व डांबरीकरण योजनेचे कागदपत्र पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी अपीलकर्ता श्री.मधुसूदन प.लिमये यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता (पथ), पुणे महानगरपालिका यांच्याकडे केली होती. संबंधित संचिका पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचे आदेश अपलीय प्राधिकाऱ्यांनी दिले, परंतु आपल्याला तीन महिने उशिरा संबंधित संचिका पाहण्यासाठी मिळाल्याच्या कारणावरुन नुकसानभरपाई व जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती या मागणीसाठी श्री.लिमये यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.लिमये यांचा अर्ज दि.१३.६.२००७ रोजी प्राप्त झाला. तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यानी विलंबाने उत्तर दिले. मुख्यत: पावसाळी कामामुळे उत्तराला विलंब झाला असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एन.एन.बारापात्रे यांनी विलंबाबाबतचा खुलासा तीन दिवसात सादर करावा असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार श्री.बारापात्रे यांनी दि.१४.८.२००८ रोजी सविस्तर खुलासा सादर केला. श्री.लिमये यांचा अर्ज प्राप्त झाला त्या काळात नस्ती लेखा विभागाकडे असून ती प्राप्त झाल्यानंतर दाखविली जाईल असे श्री.लिमये यांना संबंधित अभियंता यांना तोंडी सांगितले होते. हा पावसाळ्याचा कालावधी असल्यामुळे पदपथ विभागाकडील संपूर्ण कर्मचारीवर्ग प्रथमच २४ तास तक्रार निवारण कक्ष निर्माण करुन नागरिकांच्या तक्रारी ४८ तासात

निरस्त करण्यात गुंतलेले होते, त्यामुळे विलंब झाला. श्री.लिमये यांनी दि.५.९.२००७ रोजी कळवून दि.१०.९.२००७ रोजी संपूर्ण संचिका दाखविण्यात आली, असे या खुलाशात श्री.बारापात्रे यांनी नमूद केले आहे. संपूर्ण खुलासा लक्षात घेता माहिती टाळण्याचा अगर नाकारण्याचा उद्देश दिसून येत नाही,त्यामुळे त्यांच्या विनंतीनुसार विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २४.६.२००९